**ठळक बातम्या**

- विविध पिकांचे दीड हजार पर्यावरणस्नेही वाण येत्या ५ वर्षात उपलब्ध करुन देण्यासाठी सरकार प्रयत्नशील असून अशा १०९ प्रजातींचं लोकार्पण लौकरच प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होणार

- ग्रामीण भागात पतपुरवठ्यामधे वाढ झाली असल्याचं केंद्रीय अर्थराज्यमंत्र्यांचं लोकसभेत निवेदन

- राज्याच्या विविध भागात पूरसदृश स्थिती/ मुख्यमंत्र्यांनी केली पुणे परिसरातल्या बाधित भागाची पाहणी.

- पॅरिस ऑलिम्पिकच्या सन्मानार्थ विशेष टपाल तिकिटांचा संच प्रकाशित

**आणि**

- पॅरिस ऑलिम्पिकमध्ये बॅडमिंटन स्पर्धेत आज भारताच्या लक्ष्य सेनचा कांस्यपदकासाठी सामना

**<><><><><>**

विविध पिकांचे दीड हजार पर्यावरण स्नेही वाण येत्या ५ वर्षात उपलब्ध करुन देण्यासाठी सरकार प्रयत्नशील असून अशा १०९ वाणांचं लोकार्पण लौकरच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार असल्याचं केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंग चौहान यांनी आज राज्यसभेत सांगितलं. फलोत्पादन निर्यातीचं उद्दिष्ट ठेवून पुढच्या ५ वर्षात देशभरात शंभर फलोद्यानं विकसित केली जाणार असून त्याकरता १८ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे असं ते

म्हणाले. शेती फायद्याची करण्यासाठी वेगळा दृष्टिकोन अंगीकारण्याची गरज आहे असं सांगून, खतांच्या वाढत्या वापराबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली. सरकार सेंद्रीय शेतीला प्रोत्साहन देत आहे, असं ते म्हणाले. शेतकऱ्यांना आधारच्या धर्तीवर ओळखपत्र जारी करण्याचा विचार त्यांनी बोलून दाखवला. सरकार शेतकरीविरोधी असल्याच्या विरोधकांच्या टीकेवर त्यांनी ताशेरे ओढले. शेतकऱ्यासाठी प्रधानमंत्री किसान सन्मान निधीतून दिल्या जाणाऱ्या ६ हजार रुपये अर्थसहाय्याचं मोल विरोधकांना कळणार नाही, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

ग्रामीण भागात पतपुरवठ्यामधे वाढ झाली असून २०१४ मधे ७ लाख ३० हजार कोटी पतपुरवठा झाला होता त्या तुलनेत २०२४ मधे २५ लाख ४६ हजार कोटी रुपये पतपुरवठा झाला, अशी माहिती केंद्रीय अर्थ राज्य मंत्री पंकज चौधरी यांनी आज लोकसभेत दिली. एका पुरवणी प्रश्नाच्या उत्तरात त्यांनी सांगितलं की किसान क्रेडिट कार्डाच्या माध्यमातून २०१४ मधे शेतकऱ्यांना सव्वाचार लाख कोटीपेक्षा जास्त पीक कर्जं देण्यात आली तर २०२४ पर्यंत ही रक्कम ९ लाख ८२ हजार लाख कोटींपर्यंत पोहोचली. कृषी उत्पादन वाढण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी केंद्रसरकारने विविद उपक्रम हाती घेतले आहेत, असं ते म्हणाले.

मुद्रा योजना आणि स्टार्टअप इंडिया अशा योजनांमधून सरकारने युवावर्गाच्या कल्याणाच्याही योजना राबवल्या असल्याचं त्यांनी सभागृहाला सांगितलं.

लोकसभेत आज आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्रालयाच्या अनुदान मागण्यांवर चर्चा होत आहे त्याचप्रमाणे गोवा विधानसभेत अनुसूचित जमातींना पुरेसं प्रतिनिधित्व देण्यासाठीचं पुनर्रचना विधेयक आज सभागृहात मांडलं जाऊ शकतं.

<><><><>

देशातल्या ३० आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि ६ प्रमुख बंदरांवर १६७ देशांतल्या नागरिकांना  ई व्हिसा सुविधा उपलब्ध असल्याची माहिती केंद्रीय पर्यटन मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांनी लोकसभेत दिली. जपान, दक्षिण कोरिया आणि यूएईच्या नागरिकांना भारतात पर्यटन, व्यवसाय, सभा- परिषदा आणि वैद्यकीय उपचारांच्या कारणासाठी आगमनानंतर व्हिसाची सुविधा उपलब्ध असल्याचं त्यांनी लेखी उत्तरात म्हटलं आहे.

<><><><>

संसदेच्या सर्व  सदस्यांनी  एक पेड माँ के नाम  या मोहिमेत जास्तीत जास्त सहभाग घ्यावा,  असं आवाहन सर्व संसद सदस्यांना पत्राद्वारे केल्याचं केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्री  भूपेंद्र यादव यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पर्यावरण संवर्धन आणि वनक्षेत्र वाढवण्यासाठी सुरू केलेलं अभियान यशस्वी करण्यासाठी सगळ्यांनी एकत्रित प्रयत्न करण्याची गरज असल्याचं ते यावेळी म्हणाले.

<><><><>

देशातल्या विक्रमी गॅस उत्पादनाचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी कौतुक केलं आहे. विकसित भारताचं उद्दिष्ट साध्य करण्यासाठी ऊर्जा क्षेत्रातली आत्मनिर्भरता महत्वाची असल्याचं  ते म्हणाले. केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंह पुरी यांच्या समाज माध्यमावरच्या पोस्टवर प्रतिक्रिया देताना त्यांनी म्हटलं आहे की  २०२०- २१ मध्ये गॅसचे उत्पादन सुमारे २८ अब्ज ७० कोटी घनमीटर होतं. जे २०२३-२४ मध्ये वाढून सुमारे ३६ अब्ज ४३ कोटी घनमीटर झालं आहे. २०२६ पर्यंत देशात गॅसचं उत्पादन ४५ अब्ज ३ कोटी घनमीटर पर्यंत पोहचेल, असा अंदाज आहे.

**<><><><><>**

देशाच्या तिन्ही सेनादलांची वित्तीय परिषद आज नवी दिल्लीत संरक्षण दल प्रमुख जनरल अनिल चौहान यांच्या अध्यक्षतेखाली होत आहे. संरक्षण दलांसाठीचा वित्तपुरवठा, आणि इतर वित्तविषयक बाबींमधे तिन्ही दलांचा ताळमेळ राखण्यावर या परिषदेत चर्चा होणार आहे.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू फिजी, न्यूझीलंड आणि पूर्व तिमोर या तीन देशांच्या दौऱ्यावर आहेत. या दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात त्या आज फिजी मध्ये नाडी इथं पोहचल्या आहेत. त्या बुधवार पर्यंत फिजीमध्ये असतील. यात्रेच्या दुसऱ्या टप्प्यात राष्ट्रपती ८ आणि ९ ऑगस्ट रोजी न्यूझीलंडमध्ये असतील. तर अंतिम टप्प्यात राष्ट्रपती १० ऑगस्टला पूर्व तिमोरला जातील.

**<><><><><>**

राज्यात अनेक जिल्ह्यांमध्ये जोरदार पाऊस झाला असून अनेक धरणांमधून मोठ्या प्रमाणावर पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे.

**पुणे** जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसानं दिलासा दिल्यानं जिल्ह्यातल्या प्रमुख धरणांमधून पाण्याचा विसर्ग कमी करण्यात आल्यामुळं पुणे शहरात निर्माण झालेली पूरस्थिती आता नियंत्रणात आली आहे. या भागांमध्ये कालपासून प्रशासन आणि एनडीआरएफच्या मदतीसाठी आवश्यक बचाव उपकरणांसह लष्करी मदत तैनात करण्यात आली आहे. दरम्यान आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुण्यातल्या पूरग्रस्त भागांना भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला.

**नाशिकमध्ये** गेल्या तीन दिवसांपासून मुसळधार पाऊस सुरू असल्यामुळं जनजीवन विस्कळीत झालं आहे. गिरणा नदीपात्रात आज मासेमारीसाठी गेलेल्या

१५ मच्छिमारांची विशेष हेलीकॉप्टरनं सुटका केली आहे. मच्छिमार रविवारी मुठा नदीमध्ये मासे पकडण्यासाठी गेले असताना गंगापुर धरणातून पाणी सोडल्यानं पूरपरिस्थिती निर्माण झाली होती. सध्या गंगापूर धरणातून ८ हजार १००, दारणा धरणातून २२ हजार ३८३ तर नांदूरमध्यमेश्वर इथून ५४ हजार २३३ क्युसेक पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे.

**धुळे** जिल्ह्यातल्या अक्कलपाडा धरणातून काल सायंकाळ पासून पाण्याचा विसर्ग करण्यात येत असल्यानं धुळे शहरातून वाहणाऱ्या पांझरा नदीला पूर आला आहे. महानगरपालिकेनं आतापर्यंत योग्य त्या उपाययोजना केल्या असून स्थानिकांना सुरक्षित स्थळी हलवलं आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटना अकोला जिल्हा शाखेच्या वतीने काल जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात आला. १ नोव्हेंबर २००५ नंतर सेवेत रुजू झालेल्या राज्यातल्या कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८२ आणि महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८४ नुसार भविष्य निर्वाह निधीसह सरसकट जुनी पेन्शन योजना लागू करण्यात यावी अशी मागणी यावेळी संघटनेच्या वतीनं करण्यात आली.

**<><><><><>**

राज्यात सामाजिक वातावरण कलुषित झालं असून, जातीय द्वेष निर्माण करणाऱ्यांना माध्यमांनी स्थान देवू नये, असं, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आहे. ते आज सोलापूर इथं पत्रकारांशी बोलत होते. मनसे आगामी विधानसभा निवडणूक लढवणार असून, त्या अनुषंगानं निवडणुकीत किती

आणि कशा जागा लढवायच्या हे ठरवण्यासाठी राज्यभर दौरा करणार असल्याचंही ठाकरे यांनी सांगितलं.

<><><><><>

पॅरिस ऑलिम्पिकच्या सन्मानार्थ आज टपाल विभागानं विशेष तिकिटांचा संच प्रकाशित केला. नवी दिल्लीत झालेल्या या कार्यक्रमाला केंद्रीय दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य शिंदे आणि युवा कल्याण आणि क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडवीय उपस्थित होते. ऑलिम्पिक आणि या स्पर्धेत उतरलेल्या क्रीडापटूंना भारताचा पाठिंबा दर्शवण्याचा या टपाल तिकीट संचामागचा उद्देश असल्याचं दूरसंचार मंत्रालयानं म्हटलं आहे.

<><><><><>

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये बॅडमिंटन स्पर्धेत आज भारताच्या लक्ष्य सेनची कांस्यपदकासाठीची लढत मलेशियाच्या झी जिया ली याच्याशी होणार आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार संध्याकाळी ६ वाजता हा सामना होईल. भारताला या स्पर्धेतलं चौथं पदक मिळवून देण्यासाठी लक्ष्य सेन प्रयत्नशील असेल. याशिवाय नेमबाजी स्पर्धेत स्कीट मिश्र सांघिक प्रकारात महेश्वरी चौहान आणि अनंतजीत सिंह नरुका आज लक्ष्याचा वेध घेणार आहेत. टेबल टेनिस सांघिक प्रकारात उपांत्यपूर्व फेरीतलं स्थान निश्चित करण्यासाठी श्रीजा अकुला, मनिका बत्रा आणि अर्चना कामत आज रोमानियाविरुद्ध लढत देत आहेत. ॲथलेटिक्समध्ये महिलांच्या ४०० मीटर स्पर्धेच्या पहिल्या फेरीत किरण पहल, तर ३००० मीटर स्टीपलचेस प्रकारात अंतिम फेरीत आशियाई स्पर्धेतला सुवर्णपदक विजेता अविनाश साबळे भारताचं प्रतिनिधित्व करतील. कुस्तीच्या मैदानात महिलांच्या ६९ किलो वजनी गटात उपउपांत्यपूर्व निशा दहिया मैदानात उतरेल. नौकानयन स्पर्धेत विष्णू सरवनन आणि नेत्रा कुमनन पुढच्या फेरीत जाण्यासाठी प्रयत्न करतील.

**<><><><><>**

पुण्यात झिका विषाणूचे आणखी सात नवे रुग्ण आढळले आहेत. या सात नवीन रुग्णांमध्ये कात्रज आणि कोंढवा भागातल्या पाच गर्भवती महिला, एक १८ वर्षीय तरुण आणि एक ४० वर्षीय पुरुषाचा समावेश आहे. संपूर्ण पुणे जिल्ह्यात आतापर्यंत ७२ जणांना झिका विषाणूची लागण झाल्याचा अहवाल जिल्हा आरोग्य विभागानं दिला आहे.

//<><><><><>//